<u>वादी क्र. १ व २ तर्फे वकील श्री मने यांच्या मार्फत उलटतपास शपथेवर सुरू</u>

१६. माझे शिक्षण दहावा वर्ग झालेले आहे. किसन सोनारकर माझे आजोबा होते. किसन सोनारकर यांचा मुलगा गंगाराम हे माझे वडील होते. माझे वडील गंगाराम किसन सोनारकर हे १५.११.२०१७ रोजी मयत झालेले आहे. माझी आई गिरीजाबाई दि १५.०८.२०१५ रोजी मयत झाली आहे. माझे वडील गंगाराम यांना मी व प्रतिवादी क्र. २ प्रेमसागर अशी मुले होती व दोन मुली नामे सुधा राजु शंभरकर व निरूपाला शरद कांबळे अशा होत्या.

१७. मौजे कोलार येथे माझ्या वडीलांची सरवे नं. २०१/२ आराजी ९.२९ अेकर जमीन होती. हे म्हणणे खरे आहे की सदर शेती ही माझ्या वडीलांना त्यांच्या वडीलांकडुन वारसा हक्काने मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांचा धंदा शेती होता. हे म्हणणे खरे नाही की माझे वडील सदर शेतीची वायजुपी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की सदर जमीन पडीत होती. हे मला माहित नाही की सदर सरवे नं. २०१/२ मधील शेती पडीत होती याबाबतचा सात बाराचा उतारा मी अभिलेखावर लावला आहे किंवा कसे. आता मला न्यायालयीन अभिलेख दाखविण्यात आला त्यामध्ये सदर सातबारा उतारा लावल्याचे दिसुन येत नाही.

प्रश्न - तुम्ही सदर जमीन पडीत असल्याचा सात बारा लावु शकता काय ?
उत्तर - नाही.
हे म्हणणे खरे नाही की गट नं. ४४ मधील शेतमिळकत ही सरवे नं. २०१/२ च्या उत्पन्नातुन खरेदी केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की ज्यावेळी गट नं. ४४ मधील शेतमिळकत खरेदी केली होती त्यावेळी शेत मिळकत २०२/२ अस्तित्वात होती. हे म्हणणे खरे आहे की सरवे नं. २०१/२ मधील शेती माझ्या वडीलांनी सन १९६८ मधे विकली होती. हे म्हणणे खरे आहे की सदर शेतमिळकत माझया वडीलांनी दि. २९.०५.१९६८ रोजी उध्दव सोनारकर यांना विकली होती.

१८. हे म्हणणे खरे आहे की माझे वडील दि. १५.११.२०१७ रोजी मयत झाल्यानंतर गट क्र. ४४ वरील शेतीवर वारस म्हणुन वादी व प्रतिवादी यांची नावे नोंदविल्या

गेली होती व वादी व प्रतिवादी यांची नावे सदर शेतीच्या महसुल विभागाच्या नोंदीवर नोंदविण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की सन २०२०-२१ मध्ये उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सदर वादी व प्रतिवादी क्र. २ यांची नावे शेतमिळकतीवर महसुल सदरी नोंद झाल्यामुळे सदर फेरफार बाबत अपिल दर्ज केली होती. हे म्हणणे खरे नाही की दि. ०७.०७.२०१६ रोजी माझ्या वडीलांनी माझ्या व माझा भाउ प्रतिवादी क्र २ यांच्या नावाने तथाकथीत मृत्युपत्र तयार करून ठेवले होते त्या आधारे पुर्वी झालेली फेरफार रदद करण्यासाठी चार वर्षांनी एसडीओ यांच्याकडे अपिल दाखल केली होती.

१९. माझे वडील मयत झाल्यानंतर एक वर्षाने माझ्या बहीणीच्या नावाने वादमिळकतीवर झालेले फेरफार रद्द करण्याकामी एसडीओ यांच्याकडे एक वर्षाचे आत अपिल दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की सदर अपिल एसडीओ यांच्या न्यायालयाने रद्द केले होते. हे म्हणणे खरे आहे की सन २०२०-२१ या वर्षामध्ये मी पुन्हा माझया बहीणीच्या नावाने झालेली वादमिळकतीवरील फेरफार रदद करण्याकामी अपिल प्रकरण क्र. ४६/आरटीएस ५९/२०२०-२१ विनोद विरूध्द प्रेमसागर व ईतर असे अपिल एसडीओ यांच्या न्यायालयात दाखल केले होते.

२०. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या वडीलांकडुन खोटे व बनावट मृत्युपत्र तयार करून घेतल्याने माझा भाउ प्रेमसागर हा बहीणीच्या विरोधात एसडीओ न्यायालयात अपिल दाखल करण्यास तयार नव्हता त्यामुळे मी त्याला विरोधी पक्ष म्हणुन नमुद केले होते.

प्रश्न - दि. ७.७.२०१६ रोजी तुम्ही जे मृत्युपत्र तुमच्या वडीलांकडुन तयार करून घेतले होते त्याची कल्पना वादी व प्रतिवादी क्र. २ यांना दिली नव्हती बरोबर आहे का ?

उत्तर - सदर मृत्युपत्र माझ्या वडीलांनी तयार करून ठेवले होते त्यामुळे मला सदर मृत्युपत्राबाबत कल्पना नव्हती.

२१. हे म्हणणे खरे आहे की प्रेमसागर हा शेडेश्वर येथे राहत होता व माझे वडील प्रेमसागर सोबत शेडेश्वर येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की मी प्रेमसागर याला म्हंटले की वडीलांची तब्येत बरी नाही मी वडीलांना नागपुर येथे उपचारासाठी नेतो व त्यानंतर मी माझ्या वडीलांना नागपुर येथे उपचाराकामी नेले व त्या ठिकाणी मी स्टॅम्पपेपरवर खोटया सहया घेउन खोटे मृत्युपत्र माझ्या वडीलांकडुन तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की

बहीणीचा हिस्सा हडप करण्यासाठी मी खोटे मृत्युपत्र माझ्या वडीलांकडुन तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की सदर मृत्युपत्रान्वये वाद शेतमिळकतीचा मी एकमेव मालक आहे हे घोषित करण्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की मृत्युपत्र मुदतीमध्ये आणण्यासाठी मी एसडीओ न्यायालयात फेरफार रद्द करण्याकामी अपिल दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की सदर अपिल मध्ये प्रेमसागर हजर होउन म्हणणे दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की एसडीओ न्यायालयाने सदर अपिलातील आदेशामध्ये दिवाणी न्यायालयात दावा दाखल करावा असे वादीला आदेशीत केले होते.

२२. हे म्हणणे खरे नाही की दि. ७.७.२०१६ रोजीचे मृत्युपत्र खोटे, बनावट व बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे आहे की सत्यभामा गुणाजी मानकर हे किसन सोनारकर यांचे अपत्य होते हे दाखविण्यासाठी मी दस्तावेज दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की सत्यभामा हिला राहुल, रविंद्र, बापु अशी तिन मुले व यशोदा, सुशिला व मनिषा अशा तिन मुली होत्या या बाबी शाबीत करण्याकामी मी कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की मी सदर सत्यभामा हिच्या वारसांना एसडीओ यांच्याकडे दाखल केलेल्या अपिलमध्ये पार्टी केले नाही. हे म्हणणे खरे आहे की सत्यभामा हिच्या वारसांनी वाद मिळकतीमध्ये हिस्सा असल्याबाबत उजर घेतलेला नाही.

प्रश्न - तुम्ही वाद मिळकत क्र. २०१/२ चे विक्रीपत्र अभिलेखावर दाखल केले आहे काय ?
उत्तर - तुम्ही दाखल केले असल्यामुळे आम्ही दाखल केले नाही.
हे म्हणणे खरे नाही की नि. क्र. २८ मध्ये सत्यभामा हिचे नाव नमुद न केल्यामुळे मी सदर विक्रीपत्राची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल केली नाही.

२३. हे म्हणणे खरे नाही की सत्यभामा ही माझ्या वडीलांची बहीण होती. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी माझ्या बहीणींना लग्नात जे काही दयायचे होते ते सर्व दिले होते हा मजकुर माझ्या शपथपत्रामध्ये चुकीचा लिहीलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की गट नं. ४४ मधील जमीन १९६७ मध्ये माझ्या वडीलांनी विकत घेतली होती त्याबाबत वादींना माहीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की गट नं. २०१/२ मधील जमीन १९६८ मध्ये माझ्या वडीलांनी विकली होती त्याबाबत वादींना माहीत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की गट नं. २०१/२ मधील जमीन माझे वडील वाईजुपी करून उत्पन्न घेत होते. हे म्हणणे खरे नाही की

गट नं. २०१/२ मधील जमीनीतुन मिळणा-या उत्पन्नातुन सदर वाद मिळकत माझ्या वडीलांनी खरेदी केली आहे. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांनी वादमिळकत स्वकष्टातुन विकत घेतली हे दाखविण्यााठी कोणतेही कागदपत्र मी अभिलेखावर दाखल केलेले नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की माझे वडील काम करीत होते.

२४. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे लेखी बयान दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की माझ्या वडीलांनी वडीलोपार्जीत जमीनीच्या उत्पन्नातुन वाद मिळकत खरेदी केली असल्याने सदर वादमिळकतीमध्ये माझ्या बहीणीचा समान हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की दि. ७.७.२०१६ रोजीचे मृत्युपत्र वादीवर बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि ०४/१२/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड